ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद ठाणे

महाराष्ट्र शासकिय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनिमयन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 कलम 8 मधील तरतूदीनूसार ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद ठाणे नागरिकांची सनद प्रसिध्द करीत आहे.

---

# नागरिकांची सनद

१. प्रस्तावना

ग्रामपंचायत विभाग हा जिल्हा परिषद ठाणे प्रशासकीय विभागाचा महत्वपूर्ण विभाग असून त्यात सर्वसाधारण 13 शाखा असून जिल्हा परिषद सर्वसाधारण व स्थायी समिती सभेचे कामकाज व जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक विषयक कामकाज साप्रवि अर्थ संकल्प, गटविकास अधिकारी यांच्या फिरती कार्यक्रम व मासिक दैनंदिनी मंजूर करणे, जिल्हा परिषद व्यतिरिक्त सभेची माहिती संकलित करणे, साप्रवि अंतर्गत सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी साखिंकी, लघुलेखक, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लिपिकवर्गिय), वाहन चालक, परिचर इ. कर्मचा-यांची भरती, बाढती बदल्या, अनुकंपा पध्दतीने नोकरी देणे, महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील अधिका-यांची आस्थापना व वेतन आणि भत्ते, जिल्हा परिषद खाते प्रमुख यांची आस्थापना, लिपिकवर्गीय कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीतून अग्रीम मंजूर करणे, वैद्यकीय बिल मंजूर करणे, माहिती अधिकारान्वये माहिती उपलब्ध करून देणे, टपाल घेणे व शाखाप्रमुख आणि संबंधित खाते प्रमुख यांना कार्यवाहीस्तव टपाल वाटप करणे, जिल्हा परिषद विभागांची आणि पंचायत समित्यांची वार्षिक तपासणी करणे. हे विषय समाविष्ट आहेत. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2009 मधील तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभाग नागरीकांची सनद प्रसिध्द करीत आहे या खात्याशी संबधीत असणा-या सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक नागरीकांना उपलब्ध करून देण्यासाठी हा विभाग बांधील आहे.

2. ग्रामपंचायत  विभागाची रचना

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी हे सामान्य प्रशासन विभागाचे मुख्य असून मा. अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांचेकडे 05 विभागाचे नियंत्रण आहे. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हे सर्व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहे. सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा यांकडे एकूण 13 शाखांमधे विषयाची विभागणी करण्यात आली आहे. (सोबत परिशिष्ठ 1 जोडले आहे)

3. कार्यपूर्तीचे वेळापत्रक

ग्रामपंचायत विभागामार्फत नागरीकांना प्रत्यक्ष पुरविण्यात येणा-या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ 1 मधे सादर करणेत आले आहे. महाराष्ट्र शासकिय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनिमयन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-याविलंबास प्रतिबंध अधिनियम  २००५ मधीलप्रकरण ३ च्या कलम ११ मध्ये नमुद केलेल्या न्यायप्रविष्ठ बाबी लोक आयुक्त किवा उप  लोक आयुक्त आणि घटनात्मक संस्था, आयोग, न्यायीक बाबी इत्यादींना कार्यपुर्तीच्या वेळापत्रकातील स्तंभ क्र.४ येथील वेळापत्रकातुन सुट राहील.

४.अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी असल्यास त्यासंबंधी परिशिष्ठ 1 मधील स्तंभ क्र. 5 मध्ये नमूद केलेल्या अधिका-याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यानूसार 7 दिवसात त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधीत अधिका-याची राहील.

यानंतर नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे याबाबत तक्रार करता येईल. गा-हाणे समक्ष भेटीने व पत्राने मांडता येईल.

4. ब) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्मानीय नागरीकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. ग्रामपंचायत विभागाचे अधिनिस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

5. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

ग्रामपंचायत विभाग नागरीकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटीबध्द आहे. ग्रामपंचायत विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पूरविताना नागरीकांना सौजन्यपुर्ण वागणूक देण्याची विभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचा-याची राहील.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदलीचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 10(1) मधील तरतूदीस अनुसरून तत्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी अति तातडीच्या स्वरूपाची नस्ती शक्यतो 4 दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबधीत नसलेल्या नस्ती 45 दिवसाच्या आत व दुस-या विभागाशी बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर 3 महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल.